# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:06.07.2024** **वार:शनिवार**

---

1. भारतीय वंशाच्या 29 संसद सदस्यांची ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्सवर निवड
2. यंदा 285 कोटी टनांपेक्षा जास्त तृणधान्य उत्पादनाचा संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषि संघटनेचा अंदाज
3. स्पर्धा परीक्षेतला गैरव्यवहार रोखण्यासाठी महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक सादर
4. 5G, 6G आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर आधारित हॅकेथॉन स्पर्धेचं सप्टेंबरमध्ये आयोजन आणि
5. बिहारमध्ये गेल्या 24 तासांत वीज पडून 19 जणांचा मृत्यू

**<u>ब्रिटीश</u>**

ब्रिटनचे नवे पंतप्रधान कीर स्टारमर यांनी भारतीय वंशाच्या ब्रिटीश खासदार लिसा नंदी यांची संस्कृती, माध्यम आणि खेळासाठी विदेश मंत्री म्हणून नियुक्ती केली आहे. लिसा या उत्तर-पश्चिम इंग्लंडमधील विगनमधून प्रचंड बहुमताने पुन्हा निवडून आल्या आहेत. लिसा या कोलकात्याचे शिक्षण तज्ञ दिपक नंदी यांच्या कन्या आहेत. त्यांचे वडील ब्रिटनमधील वंश संबंधांच्या क्षेत्रात केलेल्या कामासाठी प्रसिद्ध होते. काल निकाल जाहीर झाल्यावर ब्रिटनच्या सार्वत्रिक निवडणुकीत हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सुमारे 29 भारतीय वंशाचे संसद सदस्य विक्रमी संख्येने निवडून आले आहेत.

**<u>शौर्य पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सशस्त्र दल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील पोलिसांना 36 शौर्य पुरस्कार प्रदान केले. काल संध्याकाळी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात प्रदान करण्यात आलेल्या शौर्य पुरस्कारांमध्ये 10 कीर्ती चक्र आणि 26 शौर्य चक्रांचा समावेश आहे. यापैकी 7 जवानांना मरणोत्तर कीर्ती चक्र आणि 7 जवानांना मरणोत्तर शौर्य चक्र प्रदान करण्यात आली. अतुलनीय शौर्य, दुर्दम्य साहस आणि कर्तव्याप्रती निष्ठा दाखविणाऱ्या जवानांना हे पुरस्कार देण्यात आले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. देशाला आपल्या शूर सैनिकांच्या शौर्याचा आणि समर्पणाचा अभिमान आहे असं पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमातील संदेशात म्हटलं आहे.

**<u>अन्नधान्य उत्पादन</u>**

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषि संघटनेनं 2024 या वर्षीचा जागतिक तृणधान्य उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार यंदा 285 कोटी टन पेक्षा जास्त तृणधान्य उत्पादनाची शक्यता आहे. अर्जेंटीना, ब्राझिल, टर्की आणि युक्रेन मध्ये मक्याचं उत्पादन अधिक राहण्याची तर आशिया मध्ये गव्हाचं उत्पादन चांगलं राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. धान्याच्या एकंदर उत्पादनापैकी तांदूळ आणि भरड धान्याचा वाटा सर्वाधिक राहील. 2024-25 मध्ये

जागतिक तृणधान्याचा साठा 30 पूर्णांक 8 टक्क्यांवर राहील तर 2025 मध्ये जागतिक तृणधान्याचा साठा 1 पूर्णांक 3 टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे.

**अटल-नवोन्मेष**

अटल इनोव्हेशन मिशनच्या वतीने कम्युनिटी इनोव्हेटर फेलो च्या दुसऱ्या तुकडीचा पदवीप्रदान सोहळा काल नवी दिल्लीत नीती आयोगाने आयोजित केला होता. या कार्यक्रमात स्टोरीज ऑफ चेंज च्या दुसऱ्या आवृत्तीचं प्रकाशन करण्यात आलं. जगाला एक चांगलं स्थान बनवण्यासाठी आवश्यक असलेला बदल घडवून आणण्याच्या उत्कटतेने जगण्याचं धाडस करणाऱ्यांसाठी हा उपक्रम आहे. देशातील नाविन्यपूर्ण उद्योजकतेला चालना देणारा अटल इनोव्हेशन मिशन हा नीती आयोगाचा एक प्रमुख उपक्रम आहे.

**पेन्शन तक्रारी**

कौटुंबिक पेन्शनच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष मोहिमेच्या पहिल्या आठवड्यात एक हजाराहून अधिक प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. केंद्र सरकारच्या कौटुंबिक पेन्शनधारकांचं जीवन सुसह्य करण्यासाठी निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनधारक कल्याण विभागाने 1 जुलैपासून महिनाभराची कौटुंबिक निवृत्ती वेतन तक्रार निवारण मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम या महिनाअखेरपर्यंत सुरू राहणार आहे.

**विधेयक**

स्पर्धा परीक्षेतले गैरव्यवहार रोखण्यासाठीचं महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध विधेयक - महाराष्ट्र विधानसभेत काल मांडण्यात आलं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा, शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी तसंच शिक्षक पात्रता चाचणी यासह शासनाच्या विविध विभाग आणि प्राधिकरणाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना या कायद्यातील तरतुदी लागू असतील. यात अयोग्य मार्गांचा वापर करणाऱ्यांना 3 ते 5 वर्ष शिक्षा आणि 10 लाख रुपये दंड करण्याची तरतूद आहे. परीक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या संस्था, सेवा पुरवणाऱ्या संस्थेचे कर्मचारी यांनाही दोषी आढळल्यास शिक्षा सुनावली जाणार आहे.

**नीट पीजी**

वैद्यकीय शाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा नीट पीजी आता 11 ऑगस्ट रोजी होणार असून ती 2 सत्रात घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय परीक्षा मंडळानं या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक काल जारी केलं. गेल्या महिन्यात परीक्षेच्या नियोजित तारखेच्या एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.

**भारत-काँगो**

भारताचं संरक्षण मंत्रालय आणि डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो यांच्यात पहिली सचिवस्तरीय बैठक काल नवी दिल्ली इथे झाली. दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्याची क्षमता पूर्ण करण्यासाठी सहकार्याची क्षेत्रं ओळखणं हे या बैठकीचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. बैठकीत प्रशिक्षण आणि संरक्षण उद्योगातील सहकार्याला चालना देण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.

**हेकेथॉन**

भारत WTSA24 अर्थात जागतिक दूरसंचार प्रमाणीकरण संघटनेसोबत यंदा सप्टेंबरमध्ये 5G, 6G आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर आधारित हॅकाथॉन स्पर्धेचं आयोजन करणार आहे. या उपक्रमाचा उद्देश नवोन्मेषक, आघाडीचे

उद्योजक आणि शिक्षणतज्ज्ञांना एकत्र आणून भविष्यातील दूरसंचार तंत्रज्ञानाचा शोध घेणं आहे. हॅकाथॉन दूरसंचार क्षेत्रातील अत्याधुनिक नवकल्पना केंद्र म्हणून काम करेल. दिल्ली, हैदराबाद आणि बेंगळुरू इथल्या 5G प्रयोगशाळांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 30 तासांच्या कार्यक्रमा दरम्यान, स्पर्धेतील सहभागी आपल्या नवकल्पना विकसित करण्यासाठी आपलं योगदान देणार आहेत.

**<u>हाथरस अटक</u>**

हाथरसमध्ये चेंगराचेंगरीत झालेल्या 121 जणांच्या मृत्यू प्रकरणी उत्तर प्रदेश पोलिसांनी देवप्रकाश मधुकर याला काल अटक केली. पोलिसांनी दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालात देव प्रकाश मधुकरचं नाव मुख्य आरोपी म्हणून नोंदवण्यात आलं आहे. मधुकर हा सर्वसत्संग आयोजन समितीचा सदस्य होता.

**<u>विम्बल्डन</u>**

विम्बल्डन टेनिसमध्ये काल भारताचा युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच जोडीदार अल्बानो ऑलिव्हेटी यांना दुसऱ्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या इगा स्विटेकने क्रोएशियाच्या पेट्रा मार्टिकचा 6-4, 6-3 असा पराभव केला.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेनं T20 सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा 12 धावांनी पराभव केला. दक्षिण अफ्रिकेनं प्रथम फलंदाजी करताना 189 झावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारतीय महिला संघ 20 षटकांत 177 धावा करू शकला.

**<u>हवामान</u>**

हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि देशाच्या ईशान्य भागात उद्यापर्यंत तर पंजाब आणि वायव्य भारतात आज मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. पूर्व आणि ईशान्य भारतात पुढील 5 दिवस वादळ आणि गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा तर कर्नाटकच्या किनारी भागातही काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

**<u>पाऊस वीज</u>**

बिहारमध्ये गेल्या 24 तासांत वीज पडून 19 जणांचा मृत्यू झाला असून, 7 जण जखमी झाले आहेत. पाऊस सुरू असताना शेतात काम करणाऱ्या आणि झाडाखाली थांबलेल्या लोकांवर वीज पडल्यानं त्यांचा मृत्यू झाला. राज्याच्या उत्तर, आग्नेय आणि दक्षिण मध्यवर्ती भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला असून पुढील 24 तासांसाठी पिवळा बावटा जारी केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.